दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.२३ मार्च २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २०५ | पाने ४ | किंमत ४ रुपये


Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 23 March 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 205 | Pages 4 | Rate 4 Rs

### ओबीसी चळवळीचा बुलंद आवाज हरवला

**मुंबई**–ऑल इंडिया ओबीसी मुस्लिम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शब्बीर अहमद अन्सारी यांचे आज निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे ओबीसी चळवळीचा एक बुलंद आवाज हरवल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनावर मंत्री छगन भुजबळ यांच्यासह अनेकांनी शोक व्यक्त केला आहे.शब्बीर अहमद अन्सारी हे गत काही महिन्यांपासून आजारी होते. काल त्यांनी आपल्या कुटुंबीयांसोबत ईद साजरी केली. त्यानंतर आज दुपारी १२.३० वा. त्यांनी जालना येथील आपल्या राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्यावर आज रात्रीच उशिरा अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. शब्बीर अन्सारी यांनी सुरुवातीला मुस्लिम ओबीसी आरक्षणासाठी खंबीर लढा दिला. त्यांनी ओबीसी आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. आपले उभे आयुष्य ओबीसींच्या न्याय हक्कासाठी समर्पित केले. त्यांनी नुकत्याच झालेल्या ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनातही सहभाग घेतला होता.

# राजकारण्यांनी स्वत:च्या मर्यादा आखल्या पाहिजे छगन भुजबळांचे भोंदू खरात प्रकरणावर भाष्य

## चौकशीत वस्तुस्थिती स्पष्ट होईल असा विश्वास; कारवाई करण्यात काहीही उशीर झाला नाही



**राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी भोंदू अशोक खरात प्रकरणाच्या पोलिस चौकशीत सर्व वस्तुस्थिती स्पष्ट होईल असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. लोकांनी अंधश्रद्धेपासून दूर राहिले पाहिजे असे माझे मत आहे. राजकारण व समाजकारणात असणाऱ्या लोकांनी या बाबतीत स्वतःच्या काही मर्यादा आखल्या पाहिजेत. कारण, आप जे काही करतो त्याचा परिणाम थेट जनतेवर पडतो हे आपण लक्षात घेतले पाहिजे, असे ते म्हणालेत. रुपाली चाकणकरांनी काही चुकीचे केले असेल तर पोलिस पाहून घेतील, असेही भुजबळ यावेळी म्हणाले.रुपाली चाकणकर यांनी शुक्रवारी रात्री आपल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. मंत्री छगन भुजबळ यांनी शनिवारी पत्रकारांशी संवाद साधताना या सर्व प्रकरणावर प्रकाश टाकला. त्यात त्यांनी लोकांना अंधश्रद्धेपासून दूर राहण्याचे आवाहन केले. तसेच राजकारण्यांनाही अशा प्रकरणांत स्वतःच्या मर्यादा आखण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले, अंधश्रद्धेपासून दूर राहिले पाहिजे असे माझे मत आहे. मंदिरांत तुम्ही ध्यानधारणा करा, योगा करा, व्यायाम करा, दर्शन घ्या. समाजात काही चांगले काम करणारे गुरुजी आहेत. ते समाजाची मनोभावे सेवा करतात. पण अशा काही लोकांमुळे सर्वजण बदनाम होतात.**

**मुंबई । प्रतिनिधी**

यांच्याकडेही (अशोक खरात) बरीच मोठ-मोठी लोकं येत होती. रुपाली चाकणकर पुण्याच्या, त्यांना काय माहिती इकडची? त्यांना सुद्धा कुणीतरी इकडे आणले असेल. त्यांना कुणी आणले हे मला माहिती नाही. पण नेले असेल कुणीतरी. पण राजकारण व समाजकारणात असणाऱ्या लोकांनी या बाबतीत काही मर्यादा आखल्या पाहिजेत. कारण, आपण जे काही करतो त्याचा परिणाम थेट सर्वसामान्य जनतेवर पडतो. आपण लिडर व पुढारी आहोत. हा एवढा मोठा माणूस असून तो तिकडे जातो, असा हा प्रभाव पडतो. आता पोलिस चौकशी करत आहेत. त्यात सत्य काय आहे हे समोर येईल. त्यांनी आणखी काही चुकीच्या गोष्टी केल्या असतील तर पोलिस त्यासंबंधी निश्चितपणे कारवाई करतील, असे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे.रुपाली चाकणकर भोंदू अशोक खरातच्या संस्थेवर होत्या अशी बाब पत्रकारांनी यावेळी छगन भुजबळ यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर ते म्हणाले, आपण सतत जावून त्यांना मदत करायला लागलो, तर मग कुणीतरी त्याला संस्थेवर घेतातच. आपल्याला व आपल्या संस्थेला मदत होईल हा यामागील उद्देश असतो. यामुळेच त्यांना त्या संस्थेवर घेतले असेल.राष्ट्रवादी काँग्रेस रुपाली चाकणकरांना महिला प्रदेशाध्यक्षपदावरून दूर करणार काय? या प्रश्नाला उत्तर देताना भुजबळ म्हणाले, राज्य महिला आयोगाचा हा भाग शासनाचा आहे. त्यात मुख्यमंत्री आदेश देणारे आहेत. त्यांच्याशी चर्चा करूनच उपमुख्यमंत्री योग्य तो निर्णय घेतील. पण पक्षाच्या महिला अध्यक्षाच्या संदर्भात हा पूर्ण अधिकार हे पक्षाला आहेत. त्यात शासन येत नाही. त्यात आता काय करायचे याचा निर्णय सुनेत्रा पवार व इतर पक्षश्रेष्ठी घेतील.

### आता भोंदू खरातवर पोलिसांचा कोप झाला

ते पुढे म्हणाले, आता अशोक खरातला अटक झाली आहे. जोपर्यंत हा पँडोरा बॉक्स उघडत नाही, तोपर्यंत सगळे दबून असतात. पण एकदा उघडण्यास सुरुवात झाली की, ज्यांच्यावर अन्याय झाले ते सर्वजण पुढे येतात. तपास यंत्रणांना माहिती पुरवतात. त्यामुळे पुढे सर्वकाही स्पष्ट होईल. या प्रकरणाचा तपास करणारे अधिकारी सर्व गोष्टींचा विचार करून योग्य ती कारवाई करतील. या प्रकरणी आता सर्वांची चौकशी होईल. अशोक खरातने अटक करण्यासाठी गेलेल्या पोलिसांना मला अटक केली तर तुमच्यावर कोप होईल असा इशारा दिला होता. पण आता त्यांच्यावरच पोलिसांचा कोप झाला आहे, असेही भुजबळ या प्रकरणी मिश्कीलपणे बोलताना म्हणाले.

## केज शहरातील वीजचोरी वर मोठी कारवाई

# शितल सय्यद मॅडम यांच्या नेतृत्वाखाली २० लाखा पेक्षा जास्त महसूल वसूली करण्यात यश



**केज शहरातील काही वीजचोरी करणारे ग्राहक दंडात्मक कारवाईमुळे मला व महावितरणच्या कर्मचाऱ्यांना धमक्या देत बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत.मात्र अशा प्रकारांना न घाबरता महावितरण व केज पोलिसांच्या माध्यमातून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल.**
**–शितल सय्यद शाखा अभियंता,महा वितरण कंपनी केज**

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महावितरण कंपनीच्या कर्तव्यदक्ष अधिकारी शितल सय्यद मॅडम यांच्या प्रभावी कार्यशैली मुळे केज शहर तथा तालुक्यात वीजचोरी विरोधात मोठी कारवाई करण्यात येत असून, वीजचोरी करणाऱ्या ग्राहकांवर दंडात्मक कारवाई करत २० लाख रुपयापेक्षा अधिक शासकीय महसूल गोळा करण्यात आला आहे.मागील महिन्यात दि.११ फेब्रुवारीपासून वसुलीची जबाबदारी पुन्हा सय्यद मॅडम व त्यांच्या टीमकडे सोपविण्यात आल्यानंतर फेब्रुवारी २०२६ मध्ये आजपर्यंत केज मधील सर्वाधिक म्हणजे तब्बल १६८% वसुली करण्यात यश आले आहे.ही कामगिरी विशेष उल्लेखनीय मानली जात आहे. याचबरोबर,सय्यद मॅडम यांच्या मार्गदर्शना खालील टीमने मागील महिन्यात ७० पेक्षा अधिक वीजचोरीच्या घटना उघडकीस आणल्या असून,या कारवाईमुळे महावितरण कंपनीसाठी २० लाख रुपयांपेक्षा अधिक महसूल मिळवून दिला आहे.सय्यद मॅडम यांनी कर्मचाऱ्यांना निर्भीडपणे कर्तव्य बजावण्याचे धडे देत सर्वांना सोबत घेत कार्य केले.त्यांच्या नेतृत्वा मुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून,केज शहर व तालुक्यातून त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.
कर्तव्यदक्ष अधिकारी लाभल्यामुळे केज तालुक्यातील महा वितरण विभागाची कामगिरी उंचावली असून,अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# केज उपजिल्हा रुग्णालयात अवघड शस्त्रक्रिया यशस्वी मिराताई कुलकर्णी यांच्या डोक्यातील गाठ काढली



**डॉ.दत्तात्रय केंद्रे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने माझी अत्यंत प्रेमाने काळजी घेतली. शासकीय रुग्णालयात इतकी आपुलकीची वागणूक मिळेल असे वाटले नव्हते. माझ्यासाठी ही सेवा खऱ्या अर्थाने ईश्वर सेवाच आहे.**
**– सौ.मिराताई किशोरराव कुलकर्णी (रुग्ण)**

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

डॉक्टरची सेवा हीच ईश्वर सेवा आहे या उक्तीचा प्रत्यय नुकताच केजमध्ये आला.उपजिल्हा रुग्णालय केज येथील वैद्यकीय अधीक्षक तथा प्रसिद्ध शल्य चिकित्सक डॉ.दत्तात्रय केंद्रे यांनी महिलेच्या डोक्यातील क्लिष्ट गाठ यशस्वी शस्त्रक्रिया करून काढून त्यांना जीवनदान दिले.या यशस्वी उपचारामुळे शासकीय रुग्णालया वरील सर्वसामान्यांचा विश्वास पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

**नेमकी घटना काय?**

सौ.मिराताई किशोरराव कुलकर्णी या गेल्या काही दिवसांपासून डोक्यातील गाठीच्या त्रासाने त्रस्त होत्या.खासगी रुग्णालयातील उपचारांचा खर्च आणि गुंतागुंत लक्षात घेता, त्यांनी उपजिल्हा रुग्णालय केज येथे धाव घेतली.या ठिकाणी डॉ. दत्तात्रय केंद्रे यांनी रुग्णाची तपासणी करून तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

**डॉक्टरांचे कौशल्य आणि कर्मचाऱ्यांची तत्परता**

डॉ.केंद्रे यांच्या मार्गदर्शना खाली अत्यंत कौशल्याने ही शस्त्रक्रिया पार पडली.शस्त्रक्रियेनंतर मिराताई यांची प्रकृती आता उत्तम आहे.केवळ शस्त्रक्रियाच नव्हे,तर त्यानंतरच्या काळात डॉ. केंद्रे आणि त्यांच्या सहकारी कर्मचारी वर्गाने केलेली आस्थेवाईक विचारपूस आणि सुश्रुषा रुग्णासाठी मानसिक आधार देणारी ठरली. रुग्णालयातील कर्मचारी वर्गाच्या या सेवाभावी वृत्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**रुग्णसेवेचा आदर्श**

शासकीय रुग्णालयातही खासगी रुग्णालयापेक्षा उत्तम दर्जाची सेवा आणि आपुलकी मिळू शकते,हे डॉ.केंद्रे आणि त्यांच्या टीमने सिद्ध करून दाखवले आहे.रुग्णाला बरे करणे हे आमचे कर्तव्यच आहे,पण जेव्हा रुग्ण आनंदाने घरी जातो,तेव्हा आमच्या कष्टाचे चीज होते,अशी भावना यावेळी डॉक्टरांनी व्यक्त केली.

# गारपीटीचा तडाखा; तात्काळ पंचनामे करून भरपाई द्या

## खासदार बजरंग सोनवणे यांचे जिल्हाधिकारी यांना पत्र

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

: जिल्ह्यात अवकाळी पाऊस आणि गारपीटीने अक्षरशः थैमान घातले असून, शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा देण्यासाठी पंचनामे करून त्वरीत आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.खा. बजरंग सोनवणे यांनी २० मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे की, १९ मार्च रोजी जिल्ह्यातील विविध भागांत झालेल्या गारपीटीमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विशेषतः गहू, हरभरा, ज्वारी यांसारख्या रब्बी हंगामातील पिकांना फटका बसला असून अनेक ठिकाणी पिके जमीनदोस्त झाली आहेत. यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेला शेतकरी अधिकच संकटात सापडला आहे.
पत्रात पुढे नमूद करण्यात आले आहे की, शेतकऱ्यांचे नुकसान लक्षात घेता प्रशासनाने विलंब न करता तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश संबंधित महसूल व कृषी विभागांना द्यावेत. प्रत्येक गावात प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानाची अचूक नोंद घेणे आवश्यक असून, पंचनाम्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता राखावी, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.तसेच, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या निकषांनुसार तातडीने आर्थिक मदत मिळावी,



यासाठी प्रस्ताव त्वरीत सादर करून मंजुरीची प्रक्रिया गतीमान करावी, अशी सूचनाही त्यांनी केली आहे. मदत वितरणात कोणताही विलंब होऊ नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष द्यावे, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे.यासोबतच, बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये एकाच वेळी ही मोहीम राबवून व्यापक स्तरावर पंचनामे पूर्ण करावेत आणि झालेल्या कार्यवाहीचा अहवाल तातडीने सादर करावा, असे निर्देशही खा.सोनवणे यांनी दिले आहेत.दरम्यान, गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत शासनाने तातडीने मदतीचा हात पुढे करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# बस स्टँडवरून महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण चोरीला गेले



दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

मुलीला भेटायला लातूरला जात असलेल्या एका महिलेचा गळ्यातील मिनी गंठण केज येथील बस स्टँडवरून चोरीला गेले आहे.
दि. १९ मार्च रोजी दुपारी केज शहरातील मंजुश्री जगदाळे या लातूर येथील शिक्षण घेत असलेल्या मुलीला भेटायला जाण्यासाठी केज येथील बस स्टँडवर थांबलेल्या असताना अज्ञात चोरट्यांनी गर्दीचा गैरफायदा घेऊन त्यांच्या गळ्यातील दीड तोळा वजनाचे सोन्याचे मिनी गंठण तोडून घेऊन फरार झाला आहे. या प्रकरणी मंजुश्री जगदाळे यांनी केज पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज दिला असून या प्रकरणी पोलिस या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फूटेजेस तपासून त्या गंठण चोराचा तपास करीत आहेत.

# संपादकीय

## भोंदूगिरी, सत्तेची छाया आणि सत्य दडपण्याचा खेळ अशोक खरात प्रकरणातून उघड होणारे भयावह वास्तव

आजच्या लोकशाही व्यवस्थेत सर्वसामान्य नागरिकांचा शासनावर असलेला विश्वास हा सर्वात मोठा आधारस्तंभ मानला जातो. परंतु जेव्हा सत्ताधारीच त्या विश्वासाला तडा देणाऱ्या घटनांमध्ये गुंतलेले दिसतात, तेव्हा प्रश्न केवळ एका व्यक्तीचा राहत नाही, तर तो संपूर्ण व्यवस्थेच्या प्रामाणिकतेवर उभा ठाकतो. भोंदू अशोक खरात प्रकरणाने सध्या राज्याच्या राजकारणात अशीच खळबळ उडवली आहे. या प्रकरणात अर्धे मंत्रिमंडळ अडकण्याच्या भीतीने ते दडपण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा रंगू लागली आहे, आणि हीच बाब अधिक गंभीर आहे. अशोक खरात नावाचा एक तथाकथित गुरु किंवा बाबा आपल्या चमत्कारांच्या, अंधश्रद्धेच्या आणि मानसिक प्रभावाच्या जाळ्यात अनेकांना अडकवत होता, हे आता उघड झाले आहे. मात्र, या भोंदूगिरीमागे केवळ एक व्यक्ती नसून, त्याला मिळालेली राजकीय पाठराखण ही अधिक धक्कादायक आहे. समाजातील काही प्रभावशाली व्यक्ती, अधिकारी आणि राजकीय नेते यांचे त्याच्याशी असलेले संबंध हळूहळू समोर येत आहेत आणि इथेच प्रश्न निर्माण होतो. जर सत्तेतील लोकच अशा भोंदूगिरीला खतपाणी घालत असतील, तर सामान्य माणसाने कोणावर विश्वास ठेवायचा?

या प्रकरणात सर्वात धोकादायक बाब म्हणजे, सत्य बाहेर येऊ नये म्हणून चाललेले प्रयत्न. तपास यंत्रणांवर दबाव, पुरावे दडपण्याचा प्रयत्न, साक्षीदारांना धमकावणे, हे सगळे चित्र लोकशाहीला कलंक लावणारे आहे. जेव्हा अर्धे मंत्रिमंडळ अडकण्याची भीती ही चर्चा पुढे येते, तेव्हा हे स्पष्ट होते की हा केवळ एक गुन्हा नसून, सत्तेच्या उच्च पातळीवर पोहोचलेला भ्रष्टाचाराचा जाळ आहे. वृत्तपत्रांनी नेहमीच जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. त्याच परंपरेत या प्रकरणाकडे पाहिले, तर ही घटना केवळ गुन्हेगारी स्वरूपाची नाही, तर सामाजिक आणि राजकीय अधःपतनाचे प्रतीक आहे. अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीविरोधात कायदे असतानाही, अशा व्यक्तींना राजकीय आश्रय मिळतो, ही वस्तुस्थिती अत्यंत वेदनादायक आहे. महाराष्ट्र ही संतांची, विचारवंतांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांपर्यंत, या भूमीने नेहमीच विवेक, विज्ञाननिष्ठा आणि सामाजिक न्याय यांचा पुरस्कार केला आहे. मग आज त्याच महाराष्ट्रात भोंदूगिरीला इतकी मोकळीक कशी मिळते? याचे उत्तर शोधताना आपण सत्तेच्या राजकारणाकडे दुर्लक्ष करू शकत नाही.

अशोक खरातसारख्या व्यक्तींना फोफावण्यासाठी केवळ लोकांची अंधश्रद्धा कारणीभूत नसते; त्यामागे सत्तेचा आशीर्वाद असतो. जेव्हा मंत्री, आमदार किंवा प्रभावशाली नेते अशा व्यक्तींच्या कार्यक्रमांना हजेरी लावतात, त्यांचे गौरव करतात, तेव्हा समाजात एक चुकीचा संदेश जातो की, ही व्यक्ती खरोखरच प्रभावशाली आहे आणि मग सामान्य माणूसही त्या प्रभावाला बळी पडतो. या प्रकरणात जर खरोखरच मंत्रिमंडळातील काही सदस्य अडकत असतील, तर तपास अधिक पारदर्शक आणि कठोर होणे आवश्यक आहे. पण दुर्दैवाने, सध्या दिसणारी परिस्थिती उलट आहे. प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत असल्याच्या चर्चा म्हणजे लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. कारण, जर सत्ताधारीच स्वतःला वाचवण्यासाठी तपासात हस्तक्षेप करत असतील, तर न्यायव्यवस्थेवरचा विश्वास कोसळतो. यापूर्वीही देशात अनेक घोटाळे, प्रकरणे समोर आली आहेत, जिथे सुरुवातीला सत्य दडपण्याचा प्रयत्न झाला पण शेवटी सत्य बाहेर आलेच. कारण सत्याला कितीही दाबण्याचा प्रयत्न केला, तरी ते कधी ना कधी उघड होतेच. अशोक खरात प्रकरणातही हेच होईल, अशी जनतेची अपेक्षा आहे. मात्र, त्यासाठी समाजाची जागरूकता आणि माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आजच्या डिजिटल युगात माहिती लपवणे इतके सोपे राहिलेले नाही. सोशल मीडिया, स्वतंत्र पत्रकारिता आणि जनतेची सतर्कता यामुळे अनेक गोष्टी उघडकीस येतात पण याचबरोबर खोटी माहिती पसरवण्याचाही धोका असतो. त्यामुळे या प्रकरणात सत्य आणि अफवा यामधील फरक ओळखणे आवश्यक आहे. तरीही, जे प्रश्न उभे राहिले आहेत, त्यांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. या प्रकरणातून आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो, तो म्हणजे अंधश्रद्धेविरोधातील लढा. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी अनेक वर्षे कार्य झाले आहे पण तरीही अशा भोंदूंचा प्रभाव टिकून आहे, याचा अर्थ अजूनही समाजात जागृतीची गरज आहे. शिक्षण, विज्ञाननिष्ठ विचार आणि सामाजिक जबाबदारी यांचा प्रसार केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. राजकीय दृष्टिकोनातून पाहिले, तर हे प्रकरण सत्ताधाऱ्यांसाठी एक मोठी कसोटी आहे. जर त्यांनी पारदर्शक आणि निष्पक्ष तपासाला सहकार्य केले, तर त्यांचा विश्वास टिकू शकतो. पण जर प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला, तर जनतेचा रोष अधिक वाढेल. कारण आजचा मतदार जागरूक आहे, प्रश्न विचारतो आणि चुकीच्या गोष्टींना माफ करत नाही.

विरोधकांची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. त्यांनी या प्रकरणाचा केवळ राजकीय फायदा घेण्याऐवजी, सत्य बाहेर येण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण हा प्रश्न केवळ सत्तेचा नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या प्रामाणिकतेचा आहे. शेवटी, या प्रकरणाकडे केवळ एक घोटाळा म्हणून न पाहता, एक मोठा सामाजिक संदेश म्हणून पाहणे गरजेचे आहे. भोंदूगिरी, अंधश्रद्धा आणि सत्तेचा गैरवापर याविरोधात समाजाने एकत्र येणे आवश्यक आहे. कारण जर आपण आज आवाज उठवला नाही, तर उद्या अशा घटना आणखी वाढतील. अशोक खरात प्रकरण हे एक आरसा आहे, जो आपल्याला आपल्या समाजाचे आणि व्यवस्थेचे खरे स्वरूप दाखवत आहे. आता प्रश्न हा आहे की आपण त्या आरशात दिसणाऱ्या वास्तवाला स्वीकारून बदल घडवणार आहोत का, की पुन्हा एकदा डोळेझाक करून पुढे जाणार आहोत? लोकशाहीची खरी ताकद ही जनतेच्या सजगतेत असते आणि आज ती सजगता दाखवण्याची वेळ आली आहे. सत्य दडपण्याचा प्रत्येक प्रयत्न हा लोकशाहीवर आघात असतो. त्यामुळे या प्रकरणात निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भीड तपास होणे हीच काळाची गरज आहे.

**प्रविण बागडे, नागपूर**
**९९२३६२०९१९**

# उभ्या जगाचा पोशिंदा थेंब घामाचे गाळतो, भरण्या जगाचे पोटं उभा संसार जाळतो, कळमआंबा येथे कवी संमेलन रंगले

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील कळमआंबा येथे शहावली दर्गा उरूस व गुढीपाडवा निमित्त यात्रा महोत्सव संपन्न झाला.शुक्रवार रोजी कवि संमेलन संपन्न झाले.कवी गोरख शेंद्रे,कवी जनार्धन सोनवणे,कवी राजेश रेवले,कवी विक्रम डोईफोडे,कवी पवन खरात,कवी डॉ.हनुमंत सौदागर,कवी विशरद पठाण आदी कवींनी बहारदार कविता सादर केल्या.शेतीमातीच्या, निसर्ग,समाज,विविध विषयांवरील कवितांना रसिकांनी दाद दिली.



गोरख शेंद्रे यांनी समाजभान जागवणारी
वाचीत जाय पुस्तक वाचीत जाय समाज,
निळ्या,भगव्या बरोबर पाडीत जा नमाज रंगाच्या
रंगाच्या भेदामध्येच बरबाद झाल्या पिढ्या उगाच
कुणाच्या भानगडीत पडू नको येड्या ही कविता
सादर केली
डॉ.हनुमंत सौदागर यांनी
शेती मातीची कविता सादर करून
उभ्या जगाचा पोशिंदा
थेंब घामाचे गाळतो,
भरण्या जगाचे पोटं
उभा संसार जाळतो
शेतकऱ्यांचे कष्ट डोळसपणे उभा केले
तर तिर्रकस मधून सध्या बुवा बाबांकडून होत
असलेले शोषण मांडताना
ज्योतिषी,भोंदूबाबा कडून भक्तीचे सूत जुळले
जाते,जाळ्यात ओढून महिलांना रात्रंदिवस छळले
जाते हे सादर करून सामाजिक भाष्य केले.
कवी राजेश रेवले यांनी
माय कवितेतून
माय घराचा उंबरा
माय अंगणी तुळस,
बापाच्या मंदीराची
माय असते कळस
ही कविता सादर आईची महती उभा केली.
पवन खरात यांनी गझल
सादर करताना
काय करावे जगताना मी,तेच नेमके समजत नाही
स्वप्न बघू की जिम्मेदारी,तेच नेमके समजत नाही
सांडून जा ढगा रे,थोड्या तरी सरी तू उरलाय
काळजाचा कोराच सातबारा
शेतकरी जीवनाच्या व्यथा उभा केल्या.
विक्रम डोईफोडे यांनी शेतकरी जीवनावर भाष्य
करणारी
'आम्हा कुनब्याच्या भाळी लिहीलस काय,
अजब तुझा न्याय नभा अजब तुझा न्याय
ही कविता सादर केली
कवी जनार्धन सोनवणे यांनी
बघा बबा जमतं का ते अन मन आपलं रमतं का
ते ही सामाजिक भाष्य करणारी कविता सादर
केली.
विशरत पठाण
चमचे सांभाळा,
ऑफिसातले काम असो वा लग्ना सारखा..
सोहळा. करतील सगळा खेळ बाबांनो चमचे
सांभाळा यांनी कविता सादर करून रसिकांची
मने जिंकली
बाबासाहेब जाधव यांनी ए जिंदगी ही कविता सादर केली. कार्यक्रमास इब्राहिम चाचा पठाण,शिवाजी सावंत ,प्रदिप इंगळे, सरपंच शशिकांत इंगळे उपसरपंच दिगंबर वाघमारे जिजाबापू टोंपे , सतीश टोंपे,आश्विन टोंपे, विसरत पठाण, तुळशीदास वाघमारे, आलिफ शेख,मेहबुब पठाण आदींचीउपस्थिती होती.सूत्रसंचालन बाबा जाधव,आभार प्रदर्शन युवराज हिरवे यांनी केले. कवीसंमेलनास महिला पुरुष विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बस स्थानक, सांस्कृतिक भवनाचे स्वप्न होईल साकार; बोरद ग्रा.प.च्या चिकाटीला अखेर यश

## बहुप्रतीक्षित बस स्थानक, सांस्कृतिक भवनाचे भूमिपूजन

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

बोरद येथील ग्रामस्थांची गेल्या अनेक वर्षांपासूनची बस स्थानकाची प्रतीक्षा आता संपली आहे. ग्रामपंचायतीने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आमदार राजेश पाडवी यांनी स्थानिक विकास निधीतून बस स्थानक आणि आदिवासी बांधवांसाठी भव्य सांस्कृतिक भवन मंजूर केले असून,दिनांक २२ मार्च रोजी या दोन्ही विकासकामांचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.सुमारे १२ हजार लोकसंख्या असलेल्या बोरद गावात हक्काचे बस स्थानक नसल्याने शालेय विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना १ किमी अंतरावरील शहादा चौफुलीपर्यंत पायपीट करावी लागत होती. ही समस्या ओळखून सरपंच अनिता भिलाव आणि ग्रामपंचायत सदस्यांनी आमदार राजेश पाडवी यांच्याकडे आग्रही मागणी केली होती. काही दिवसांपूर्वी गावात आलेल्या आमदार राजेश पाडवी यांना महिला भगिनींनी आणि ग्रामस्थांनी कळकळीची विनंती करून या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आणून दिले होते. याची तत्काळ दखल घेत आमदारांनी 'मुख्य बाजार परिसर ' भागात बस स्थानक मंजूर केले.




**सांस्कृतिक भवनासाठी १ कोटींचा निधी**

गावातील ७१ टक्के आदिवासी बांधवांच्या सामाजिक आणि कौटुंबिक कार्यक्रमांसाठी जागेची अडचण भासत होती. ग्रामपंचायतीने ही बाब आमदारांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर, त्यांनी १ कोटी रुपयांचा भरीव निधी सांस्कृतिक भवनासाठी मंजूर केला. गावाबाहेरील तलावाजवळ आणि महादेव मंदिरासमोर हे भव्य भवन साकारले जाणार आहे. हा भूमिपूजन सोहळा सरपंच अनिता भिलाव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी व्यासपीठावर माजी उपसभापती विजय राणा, उपसरपंच संतोष ढोडरे यांच्यासह राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.या ऐतिहासिक प्रसंगी बोरद ग्रामपंचायतीचे आजी-माजी सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या या यशस्वी प्रयत्नांमुळे गावातील दळणवळणाचा आणि सामाजिक कार्यक्रमांचा प्रश्न सुटल्याने संपूर्ण बोरद परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

**या आधीही बोरद गावात बस स्थानक आहे मात्र ते गावाबाहेर बांधण्यात आले आहे. गावाबाहेरील अर्थात शहादा चौफुली पर्यंत गावातील बाजारपेठेचा अंतराचा विचार केलास हे अंतर ६०० ते ८०० मीटर पर्यंत येते. मुख्य बाजार परिसरापासून बऱ्याच लोकांची घरे ही अजून ८०० ते ९०० मीटर पर्यंत लांब आहेत. अशा परिस्थितीत म्हाताऱ्या माणसांना गावाबाहेर येऊन बसमध्ये बसावे लागत होते आणि शाळेतील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना देखील हे मोठे अडचणीचे ठरत होते. रात्री अपरात्री बस उशिरा आल्याने एवढे अंतर कापून गावात जाणे सगळ्यांनाच अडचणीचे होते हीच बाब लक्षात घेऊन ग्रामपंचायतने आमदार राजेश पाडवी यांना विनंती केली होती आणि त्या विनंतीनुसार आमदार पाडवी यांनी गावाच्या मुख्य बाजार परिसरातच बस स्थानक मंजूर केले. आणि कामाचा शुभारंभ देखील केला. यामुळे बोरद ग्रामस्थांकडून त्याचबरोबर ग्रामपंचायत प्रशासणाकडून आमदार राजेश पाडवी यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहे.**

# सातपुड्यातील आमचूर व्यवसायाला अवकाळीचा 'फटका' कोकणच्या धर्तीवर पीक विमा लागू करण्याची शेतकऱ्यांची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी । मोलगी**

नैसर्गिक आंबा उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या सातपुडा परिसरातील आमचूर व्यवसायाला यंदा निसर्गाच्या लहरीपणाचा मोठा फटका बसला आहे. एप्रिल-मे महिन्यात कैरीपासून आमचूर तयार करण्याच्या कामाला वेग येतो, मात्र यंदा हंगाम सुरू होण्यापूर्वीच अवकाळी पाऊस, गारपीट आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. गारपिटीमुळे कैऱ्यांवर डाग पडल्याने उत्पादनावर त्याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून, यंदा आमचूर उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त होत आहे. सातपुड्यातील या आमचूरला दिल्ली, जबलपूर, जयपूर आणि इंदूर यांसारख्या मोठ्या




बाजारपेठांमध्ये मोठी मागणी असते, मात्र यंदाच्या नैसर्गिक संकटामुळे हा व्यवसाय अडचणीत सापडला आहे.विशेष म्हणजे, महाराष्ट्रातील कोकण भागात आंबा पिकासाठी शासनाकडून पीक विमा योजना लागू आहे, परंतु आकांक्षी जिल्हा असूनही सातपुडा परिसरातील आंबा व आमचूर उत्पादक शेतकऱ्यांना अशा कोणत्याही विमा संरक्षणाचा लाभ मिळत नाही. यामुळे वर्षानुवर्षे नुकसान सोसावे लागणाऱ्या शेतकऱ्यांनी आता कोकणच्या धर्तीवर येथेही पीक विमा योजना लागू करण्याची मागणी लावून धरली आहे. कृषी विभागाकडून या मागणीकडे वारंवार दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही शेतकऱ्यांनी केला आहे. अक्कलकुवा तालुक्यातील काठी, राऊतपाडा, मोलगी, सुरगस, पिंपळखुटा यांसह अनेक गावांतील बागांचे नुकसान झाले असून लहान कैऱ्या मोठ्या प्रमाणात गळून पडल्या आहेत. या परिस्थितीची दखल घेत मोलगीचे अप्पर तहसीलदार नितीन पाटील यांनी नुकसानीचे अधिकृत अहवाल तलाठ्यांमार्फत मागविले आहेत. प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी आर्त हाक या भागातील आदिवासी बांधवांनी दिली आहे.

# उमटे धरणाचा गाळ काढायला सरकारला ठेकेदारच नाही?-७७ गावांच्या पाण्याशी सुरू खेळ!

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

उमटे धरणाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या तब्बल ७७ गावांतील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून, धरणातील गाळ काढण्यासाठी सरकारला सक्षम ठेकेदारच सापडत नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर उमटे धरण संघर्ष ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. राकेश पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देत प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, उमटे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना आणि धरणातील गाळ काढण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. धरणाच्या संरक्षण भिंतींची दुरुस्ती आणि साचलेला गाळ काढण्याचे काम ठेकेदाराअभावी रखडले असून संपूर्ण प्रक्रिया अक्षरशः ठप्प झाली आहे.महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने यासाठी तब्बल चार वेळा ई-निविदा प्रसिद्ध केल्या. मात्र, पहिल्या तीन वेळा एकाही ठेकेदाराने प्रतिसाद दिला नाही, तर चौथ्या वेळी आलेल्या दोन निविदा अपूर्ण कागदपत्रांमुळे बाद करण्यात आल्या. परिणामी, कोट्यवधींचा प्रकल्प कागदोपत्रीच राहिला असून नागरिकांना आजही गाळमिश्रित पाणी पिण्याची वेळ येत आहे.

विशेष म्हणजे, जलजीवन मिशन अंतर्गत सुमारे ८.८१ कोटी रुपयांचा हा प्रकल्प ३१ जानेवारी २०२५ रोजी प्रथम जाहीर करण्यात आला होता. त्यानंतरही वारंवार निविदा काढूनही कामाला गती मिळालेली नाही, ही प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे.दरम्यान, प्रशासन अपयशी ठरत असताना स्थानिक



पातळीवर सामाजिक बांधिलकीतून उमटे धरण संघर्ष ग्रुप आणि अनेक मान्यवरांनी पुढाकार घेत गाळ काढण्याचे प्रयत्न केले. यात चित्रलेखा पाटील, प्रशांत नाईक, दिलीप भोईर, सुरेंद्र म्हात्रे, सरपंच हर्षदा मयेकर यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग होता. मात्र, हे प्रयत्न तात्पुरते ठरत असून कायमस्वरूपी उपाययोजना अद्याप झालेली नाही.यामुळे धरणातून होणारा पाणीपुरवठा दूषितच राहिला असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.याच पार्श्वभूमीवर अँड. पाटील यांनी शासनावर सडकून टीका करत म्हटले आहे की, गाळ काढण्याचे केवळ नाटक न करता तात्काळ सक्षम समिती नेमून योग्य ठेकेदाराची नियुक्ती करावी. आवश्यक असल्यास निविदेच्या अटी व शर्ती बदलून हा प्रश्न मार्गी लावावा. दरम्यान, पिण्याच्या पाण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२७ मध्ये महाडच्या चवदार तळ्यावर ऐतिहासिक आंदोलन केले होते. त्या आंदोलनाला जवळपास शतक पूर्ण होत असताना आजही रायगड जिल्ह्यातील नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे, ही शासनासाठी लाजिरवाणी बाब असल्याची भावना व्यक्त होत आहे. ठेकेदार नाही म्हणून काम ठप्प, की प्रशासनाचा निष्काळजीपणा? - असा सवाल आता जनतेतून उपस्थित होत आहे.

# निलंगा येथे ग्राम बाल संरक्षण समितीचे एकदिवसीय प्रशिक्षण संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**लातूर । प्रतिनिधी**

निलंगा येथे बालविवाह रोखण्यासाठी आणि महिला-बालकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी प्रशासकीय पुढाकार जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, लातूर आणि एकात्मिक बालविकास प्रकल्प (ख.उ.ऊड.) कार्यालय, पंचायत समिती निलंगा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २० मार्च २०२६ रोजी पंचायत समितीच्या सभागृहात ग्राम बाल संरक्षण समितीचे एकदिवसीय प्रशिक्षण उत्साहात पार पडले. या प्रशिक्षणातून बालकांचे हक्क, संरक्षण कायदे आणि महिलांच्या सुरक्षिततेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



तज्ज्ञांचे मार्गदर्शन: बाल हक्क आणि कायदे

जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या वतीने उपस्थित असलेल्या तज्ज्ञ अधिकार्यांनी विविध विषयांवर प्रकाश टाकला:

* श्री. कांबळे, श्री. गायकवाड आणि श्री. संभाजी (बाल संरक्षण अधिकारी): यांनी बालविवाह प्रतिबंध, समाजात असलेला लिंग भेदभाव दूर करणे, शालेय मुलांसाठी 'गुड टच-बॅड टच'ची संकल्पना आणि ग.ग. -लीं (बाल न्याय कायदा) यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर तांत्रिक आणि व्यावहारिक माहिती दिली.
* श्री. साळुंके (संरक्षण अधिकारी): यांनी 'कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५' आणि शासनाच्या 'बालसंगोपन योजने'ची सविस्तर माहिती देऊन गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे आवाहन केले.

साहित्य वाटप आणि उपस्थिती

या प्रशिक्षणाचे खास वैशिष्ट्य म्हणजे, उपस्थित प्रत्येक ग्राम बाल संरक्षण समितीला शासन निर्णय, भिंती पत्रके आणि माहिती पुस्तिकांचे वाटप करण्यात आले. हे वाटप पंचायत समितीच्या माननीय सभापती श्रीमती सुनीता वाघमारे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास खालील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती:

* श्रीमती सुनीता वाघमारे (माननीय सभापती, पं.स. निलंगा)
* श्रीमती माने (माननीय उपसभापती, पं.स. निलंगा)
* श्री. सतीश पाटील (गटविकास अधिकारी)
* श्री. अनिल सुवर्णकार (सी.डी.पी.ओ.)
* श्री. दत्तात्रय जगताप (विस्तार अधिकारी)

यासोबतच तालुक्यातील सर्व पर्यवेक्षिका आणि मोठ्या संख्येने अंगणवाडी सेविका प्रशिक्षणास उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे नियोजन

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सी.डी.पी.ओ. श्री. अनिल सुवर्णकार यांनी केले, ज्यामध्ये त्यांनी प्रशिक्षणाचा उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संरक्षण अधिकारी श्री. साळुंके यांनी अत्यंत प्रभावीपणे केले, तर उपस्थितांचे आभार विस्तार अधिकारी श्री. दत्तात्रय जगताप यांनी मानले.

निलंगा तालुक्यातील बाल संरक्षण यंत्रणा अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने हे प्रशिक्षण अत्यंत फलदायी ठरले आहे.

# कोण म्हणत मुलगा नसताना आदर्श सून नसते

दैनिक वादळ वार्ता

**पुसद । प्रतिनिधी**

समाजात अनेकदा असे ऐकायला मिळते की मुलगा नसताना सून असूच शकत नाही. पण खरंच नाती फक्त रक्ताच्या किंवा परंपरेच्या चौकटीत बसलेली असतात का? खरं पाहिलं तर नाती मनाने जपली जातात.

घरात मुलगा किंवा पती दोघेही नसताना ही एकटी स्त्री, नातेवाईक किंवा घराशी जोडलेली व्यक्ती त्या घराची जबाबदारी मनापासून स्वीकारते. घरात सासू नसतानाही सासर्यांना वडिलाप्रमाणे मान देते, त्यांच्या सुखदुःखात साथ देते. आणि घराला आपले मानून सांभाळ करते.

सून म्हणजे केवळ नात्याचा दर्जा नाही, तर ती प्रेम आदर आणि जबाबदारीची ओळख आहे. ती घरातील मोठ्यांचा सन्मान करते.त्यांची काळजी घेते आणि कुटुंबात एकोप्याचे वातावरण निर्माण करते. खरंतर नाती कागदावर किंवा समाजाच्या परिभाषेत तयार होत नाहीत. ती तयार होतात प्रेमाने, विश्वासाने आणि एकमेकांसाठी असलेल्या जिव्हाळ्याने त्यामुळे पती असो वा नसो जी व्यक्ती घराला आधार देते आणि नाती मनापासून जपते तीच त्या घराची सून असते.

आदर्श सूनहा शब्द उच्चारला की काही ना तो विनोद वाटतो. माझ्या मते, आदर्श सून ही कुठलीतरी व्यक्ति नसून आपल्या सहवासातील श्रीमती. शिला राजेश भांदुर्गे आहे. एक साधी, सरळ स्त्री आहे. पतीचे निधन होऊन चार वर्ष होत आहे. तरी आपल्या सासर्यांची सेवा करीत आहे. त्यासोबतच नोकरी करू नही.संपूर्ण घराची जबाबदारी सांभाळून सासऱ्याची प्रेमाने सेवा केवळ कर्तव्यापूर्ती नाही, तर ती प्रेम, आदर आणि संस्काराची जिवंत उदाहरण आहे. त्यांनी समाजातील त्या समजुतीला खोटे ठरवले.की पतीच्या निधनानंतर सासरचे नाते कमी होते. उलट, त्यांनी सिद्ध केले की खरी नाती काळाच्या आणि परिस्थितीच्या पलीकडे असतात.

श्रीमती. शीला भांदुर्गे यांचे जीवन आपल्याला असे शिकविते की नाती जपण्यासाठी फक्त शब्द नव्हे, तर कृती महत्त्वाचे असते. त्यांच्या या प्रेरणादायी प्रवासाला मनापासून सलाम.

**प्रा. सुनिता पवार (राठोड)**
**९६२३७७९९९८**

# कोप्रोली येथे श्री साई चरित्र पारायण, श्री सत्यनारायण महापूजा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**उरण । प्रतिनिधी**

सालाबाद प्रमाणे ॐ साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ कोप्रोली (उरण )यांच्या सौजन्याने गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर विविध धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही गुढीपाडव्याचे औचित्य साधून बुधवार दिनांक १८/३/२०२६ ते गुरुवार दिनांक १९/३/२०२६ रोजी श्री साईबाबांचे साई चरित्र पारायण व श्री सत्यनारायणाचे महापूजा व साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. बुधवार व गुरुवारी दररोज काकड आरती, बाबाचे मंगल स्नान,श्री साई चरित्र पारायण, मध्यान्ह आरती, हरिपाठ, साईबाबांचे धुपारती असे विविध धार्मिक उपक्रम मोठया उत्साहात संपन्न झाले.दि १९/३/२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या साई भंडाराचा (महाप्रसादाचा ) साई भक्तानी, भाविक



भक्तांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. रात्री ९ वाजता श्री बापूजी देव कला मंच व अर्णवी आर्ट कोप्रोली उरण प्रस्तुत साई गीत, लोकगीत,कोळीगीतांचा मराठी नजराणा कार्यक्रम सादर करण्यात आले. आलेल्या प्रत्येक प्रमुख पाहुण्यांचे तसेच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.उरण तालुक्यातील कोप्रोली गावातील गणेश मंदिर येथे आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला जनतेचा भाविक भक्तांचा उत्तम प्रतिसाद लाभला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ कोप्रोली व साई सेवक, ॐ साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ उरण व साई सेवक, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था, सर्व महिला बचत गट, माऊली हरिपाठ मंडळ, सर्व क्रिकेट क्लब, बापूजी देव कला मंच, अर्णवी आर्ट, थ्री व फोर व्हीलर रिक्षा चालक-मालक संघटना कोप्रोली, ग्रामस्थ मंडळ कोप्रोली आदी विविध संस्था,संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. सर्वच कार्यक्रमाचे सुंदर,उत्तम असे नियोजन व आयोजन केल्याने सर्वांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले

# संतोष होनराव एलएलबी उत्तीर्ण

दैनिक वादळ वार्ता

**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड तालुक्यातील जांब खुर्द येथील संतोष निळकंठराव होनराव यांनी एलएलबी परीक्षा उत्तीर्ण करून आपल्या गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांनी नांदेड येथील नारायणराव चव्हाण महाविद्यालयातून शिक्षण घेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत ही पदवी संपादन केली.संतोष होनराव हे गावातील दुसरे विधीतज्ञ ठरल्याने संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून विविध सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक त्यांचे कौतुक करत आहेत.



अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून त्यांनी मिळवलेले हे यश अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून ओळख असलेल्या संतोष होनराव यांच्या यशामुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचला आहे.त्यांचे वडील स्वर्गीय नीलकंठराव होनराव यांचे आपल्या मुलाला वकील बनवण्याचे स्वप्न होते. संतोष होनराव यांनी एलएलबी उत्तीर्ण होऊन ते स्वप्न साकार केले असून त्यांच्या कुटुंबियांनीही आनंद व्यक्त केला आहे.

# प्राची बोरकरची नवोदय साठी निवड झाल्याबद्दल सत्कार



दैनिक वादळ वार्ता

भूम येथील गुरूदेव दत्त हायस्कूल ची विद्यार्थिनी प्राची महेश बोरकर हिची जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झाली या परीक्षेत ९७.५०टक्के गुण मिळविले आहेत या यशाबद्दल वंजारवाडी ग्रामपंचायत च्यावतीने उपसरपंच प्रभाकर डोंबाळे पत्रकार रविंद्र लोमटे यांनी सन्मान करून शुभेच्छा दिल्या

# औसा येथे मुक्तेश्वर संगीत समारोह संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**औसा । प्रतिनिधी**

दि. २० मार्च २०२६ रोजी औसा येथील श्री मुक्तेश्वर मंदिरात गुढी पाडव्याचे औचित्य साधून गुरुवारी श्री मुक्तेश्वर संगीत समारोहाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी लहान बाल कलाकारांच्या गायन वादनानंतर वैष्णवी बरकते यांनी यमन रागातील येरी आली पियाबिन या बंदिशीनंतर बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल हे भजन, अक्षय व्हाव ळे यांनी राग पुरियाधनाश्री आणि राजा पंढरीचा भजन, प्रा. वेदांग धाराशिवे यांनी राग जोग आणि भजन आणि पं. शिवरुद्र स्वामी यांनी अनंता मधुसूदन याबरोबर एका कबीर भजना नंतर भैरविणे सांगता केली यावेळी हार्मोनियम साथ अविनाश यादव यांनी तर चैतन्य पांचाळ यांनी तबला साथ संगत केली प्रा. युवराज हालकुडे यांनी आभार मानले.

# नव्या बदलांना स्विकारणाऱ्या शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणार-मयंक गांधी

## जिथे मने जोडली जातात तिथेच पाणी थांबते-सत्यजित भटकळ

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

परळी ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी केवळ शेतीत बदल करून चालत नाही, तर विचारांत आणि सामूहिक कृतीतही परिवर्तन आवश्यक आहे. याच दृष्टीकोनातून ग्लोबल विकास ट्रस्टकडून माती, शेती आणि मती या त्रिसूत्रीवर आधारित कामाला गती देण्यात येत आहे. आतापर्यंत वैयक्तिक पातळीवर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर देण्यात आला होता; मात्र आता गाव पातळीवर एकात्मिक विकास घडवून आणण्याचे मोठे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे. ग्रामीण भागातील वास्तव पाहता, अनेक शेतकरी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यास संकोच करतात. काही ठिकाणी पाण्याची आणि ज्ञानाची कमतरता, तर काही ठिकाणी भांडवलाचा अभाव ही मोठी अडचण आहे. या पार्श्वभूमीवर ग्लोबल विकास ट्रस्ट शेतकऱ्यांना एकत्र आणून गट पद्धती विकसित करत आहे. या गटांमुळे केवळ उत्पादनातच वाढ होत नाही, तर दर्जेदार शेती, बाजारपेठेतील योग्य दर





आणि सामूहिक निर्णयक्षमतेलाही बळ मिळते. या प्रक्रियेतून शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढत असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी मिळत आहे. अशा बदलांच्या प्रवासात शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत देण्याचा निर्धार मयंक गांधी यांनी व्यक्त केला.

पाण्याचे व्यवस्थापन आणि सामाजिक ऐक्य यांचा अतूट संबंध अधोरेखित करताना पानी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ यांनी महत्त्वपूर्ण मुद्दा मांडला. जिथे मने जोडली जातात तिथेच पाणी थांबते आणि तिथेच खरी समृद्धी निर्माण होते, असे सांगताना त्यांनी गावातील एकोपा, सहभाग आणि सामूहिक श्रम यांचे महत्त्व अधोरेखित केले. एकटा ते ऐकता हे सूत्र केवळ घोषवाक्य नसून ग्रामीण विकासाचा पाया आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. अंबाजोगाई तालुक्यातील मौजे मांडवा पठाण येथे झालेला कार्यक्रम हा या व्यापक विचारांचा प्रत्यक्ष नमुना ठरला. नव्याने केळी लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून आर्थिक व तांत्रिक सहाय्य देण्यात आले. भांडवलाच्या अभावामुळे मागे राहणाऱ्या शेतकऱ्यांना -ण डारश्रश्र ऋळपरपलश इरपज्ञ च्या माध्यमातून कर्जसहाय्य उपलब्ध करून देण्यात आले, तर सिंचनासाठी ३८ शेतकऱ्यांना ठिबक संचांचे वितरण करण्यात आले. गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर उर्वरित शेतकऱ्यांना मदत देऊन या उपक्रमाला पूर्णता देण्यात आली. मांडवा पठाण येथील हनुमान मंदिरात झालेल्या या कार्यक्रमातून एक स्पष्ट संदेश समोर आला. शाश्वत शेती आणि समृद्ध गावांसाठी केवळ संसाधने नाहीत, तर सामूहिक विचार आणि एकजूट हीच खरी ताकद आहे. या कार्यक्रमास ग्लोबल विकास ट्रस्टचे ट्रस्टी संजय परमार, सरपंच गणेश रुद्राक्ष, सत्यप्रेम नरवणे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. मांडवा पठाण येथील कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून पापनाशी नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण करण्यात येत असून त्यामध्ये ऋठ- घेतले जात आहेत. या संपूर्ण कामाची पाहणी करून त्याच्या प्रत्यक्ष स्वरूपाची पाहणी करण्यात आली. तसेच रेवली, मोहा, करेवाडी आणि कान्नापूर येथील प्रगतिशील शेतकऱ्यांच्या शेतांना भेट देत आंबा, डाळिंब, केळी, लिंबू तसेच रेशीम शेतीची प्रत्यक्ष पाहणी सत्यजित भटकळ यांनी केली. विविध पिकांच्या व्यवस्थापन पद्धती, उत्पादनातील गुणवत्ता आणि शेतकऱ्यांनी अवलंबलेल्या नवकल्पनांची त्यांनी माहिती घेतली. या भेटीदरम्यान त्यांच्या समवेत डि. एल. मोहिते आणि संदीप जोशी उपस्थित होते.

# मुलांच्या आवडीनुसार क्षेत्र निवडू द्या,आपली आवड त्यांच्यावर लादू नका-अँड.उद्धवराव कराड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दि.१७ मार्च रोजी साने गुरुजी निवासीमाध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा पालकमेळावा संपन्न झाला.यावेळी पंचक्रोशीतील गावातून प्रवेशित विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून संस्थाध्यक्ष अँड. उद्धवराव कराड सर हे म्हणाले की,यावर्षी झालेल्या परीक्षा पाहता बोर्डाने आणि शिक्षण विभागाने जो मीटिंग इन कॅमेरा इन कॅमेरा परीक्षा घेऊन कॉपीमुक्त अभियान राबवले आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रवृत्त करण्याचे कामच केले आहे.ज्यामुळे सर्व केंद्रावरील परीक्षा अतिशय कडक वातावरणात झाल्या विद्यार्थी गोंधळलेल्या अवस्थेत होते.एकंदरीत परीक्षाचे वातावरण बघता विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय पर्यायच राहणार नाही. विद्यार्थ्यांना नियमित कॉलेजला न पाठवता खाजगी शिकवणीला पाठवत आहेत.पालकांनी नियमित कॉलेजला पाठवावे व नियमित कॉलेजमधल्या तासिका करू द्याव्यात जेणेकरून कॉलेजमध्ये सर्व विषयांचा अभ्यास होईल व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.पालकांनीआपल्या विद्यार्थ्यांना लातूरला ठेवण्याचा आग्रह धरू नये,सायन्स घेण्याचा आग्रह धरू नये.कारण विद्यार्थ्यांची क्षमता पाहता इंग्रजीवर प्रभुत्व असणारे प्रारूप पाहता त्याला स्वतः निर्णय घेऊ द्यावा.नीट परीक्षेच्या नावाखाली विद्यार्थ्यांची आणि स्वतःची फसवणूक करून घेऊ नये.खऱ्या अर्थाने विद्यार्थी जर चांगला असेल तर कोणत्याही शाळेमध्ये तो यश संपादन करू शकतो.जर विद्यार्थीची,आवड,नसेल तर मग लातूर येथे ठेवले काय आणि जगाच्या पाठीवर कुठेही ठेवले तरीही त्याला यश मिळू शकणार नाही म्हणून सर्व पालकांनी सावध राहावे.विद्यार्थ्यांना नियमित कॉलेजमध्ये पाठवावे कॉलेजमध्ये सातत्याने भेटी द्याव्यात.आपला विद्यार्थी काय करतो काय नाही करत या संदर्भाने कॉलेज मध्ये आल्यानंतर प्राचार्यांशी,शिकवत असलेल्या इतर प्राध्यापकांशी विचार विनिमय करावा.कॉलेज मध्ये



होणारे इतर उपक्रम ज्यामध्ये आपल्या विद्यार्थ्याने सातत्याने सहभाग घेतला पाहिजे जेव्हा विद्यार्थी कॉलेज मध्ये इतर सर्व उपक्रमा मध्ये भाग येईल तेव्हाच खऱ्या अर्थाने त्याचा विकास होईल मात्र विद्यार्थी खाजगी शिकवणीच्या नावाखाली सर्रास कॉलेज बुडवत आहेत आणि पालकही त्याला मूक संमती देत आहेत हे अतिशय चुकीचं तर आहेच परंतु मुलांचा यामुळे मानसिक बौद्धिक विकास थांबला गेला आहे.साने गुरुजी विद्यालयामध्ये एक जरी विद्यार्थी उपस्थित राहिला तरी नियमित तासिका होत आहेत आणि त्या होत राहतील त्याचबरोबर विद्यार्थ्यांना संगणका बरोबरच विज्ञान विषयासह इतर विषयाच्या प्रयोगशाळा, ग्रंथालय,एआयकॉर्डिंग लॅब,नीटसाठी मोफत ऑनलाईन व ऑफलाईन तासिका खाजगी लावण्यासाठी राखीव वेळ तसेच उन्हाळी सुट्टी मध्ये फाउंडेशन कोर्स इत्यादी सुविधा साने गुरुजी निवासी विद्यालया मध्ये साने गुरुजी निवासी उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये माहे एप्रिल पासूनच एकता दहावीचा अभ्यासक्रम व अकरावी फाउंडेशन अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे तसेच उर्वरित वेळात मोफत ऑनलाईन तासिका विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत त्याचबरोबर संगणक देखील मुलां साठी खुल्या असतील तरी सर्व विद्यार्थ्यांनी व पालकांनी याचा फायदा घ्यावा असे अहवाल केले.यावेळी श्री.मैंद ज्ञानोबा या पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.कविता गीते मॅडम यांनी केले तर सूत्र संचालन श्रीमती कुलकर्णी मॅडम यांनी केले.या कार्यक्रमास मोठ्या संख्येने पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# क्लासेसमधील गर्दीत विद्यार्थ्यांचे भवितव्य हरवू देऊ नका-माजी प्राचार्य विठ्ठल काळे यांचे प्रतिपादन

## अचिव्हर्स अकॅडमीतर्फे करिअर मार्गदर्शन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

आजच्या स्पर्धात्मक युगात मोठ्या शहरांमध्ये एकाच वर्गात १५०० पर्यंत विद्यार्थी बसवले जातात. अशा अफाट गर्दीत प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे शक्य होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची खरी प्रगती होत आहे का, याचा पालकांनी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. केवळ गर्दीचा भाग बनून विद्यार्थ्यांचे भवितव्य हरवू देऊ नका, असे परखड प्रतिपादन स्वा. सावरकर कनिष्ठ महाविद्यालय, बीडचे माजी प्राचार्य विठ्ठल काळे यांनी केले. अचिव्हर्स अकॅडमी, बीड यांच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, बक्षीस वितरण व करिअर मार्गदर्शन या कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य मा. प्रदीप गाडे (माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जवळा-म्हाळस), मा. भारत मगर (मुख्याध्यापक,




भीमसिंह विद्यालय, मातोरी) आणि मा. भीमराव मिसाळ (शालेय समितीचे अध्यक्ष, खोकरमोहा), मा.के. डी. राऊत, अचिव्हर्स अकॅडमीचे संचालक प्रा.अर्जुन राठोड, नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डी.डी.राऊत उपस्थित होते. पुढे बोलताना विठ्ठल काळे यांनी विद्यार्थ्यांच्या करिअरला योग्य दिशा देण्यासाठी प्रा. प्रदीप रोडे व त्यांच्या टीमने उचललेले पाऊल धाडसी असल्याचे नमूद केले. केवळ ५० ते १०० विद्यार्थ्यांच्या मर्यादित बॅचेस आणि तज्ज्ञ प्राध्यापकांचा थेट संवाद यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांच्या घडणीत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. चुकीचा मित्रपरिवार आणि मोबाईलचा अतिरेक हे विद्यार्थ्यांच्या प्रगतीतील प्रमुख अडथळे असल्याचे त्यांनी नमूद केले. जिथे शिस्त आहे, तिथेच यश आहे, असे स्पष्ट करत त्यांनी विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर राहावे, हीच संस्थेची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.प्रस्तावनेत प्रा.अर्जुन राठोड यांनी अकॅडमीतील अत्याधुनिक सुविधा, मजबूत पायाभूत सुविधा आणि अनुभवी फॅकल्टीबाबत सविस्तर माहिती दिली. तुमची मेहनत हेच आमचे खरे यश आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिक प्रयत्न करण्याचे आवाहन केले.यानंतर अचिव्हर्स अकॅडमीच्या वतीने जानेवारी २०२६ मध्ये इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या 'एन्ट्रन्स टेस्ट'मधील प्रत्येक विद्यालयातील टॉप टेन गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार व बक्षीस वितरण करण्यात आले.कार्यक्रमाला प्रा. संजय खाडे, प्रा. के. एल. मीना, प्रा. अमरजित चौधरी, प्रा. बबिता मॅडम, माधुरी घुमरे मॅडम यांच्यासह विद्यार्थी, पालक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर वाघमारे यांनी तर आभार डॉ. विकास वाघमारे यांनी मानले.

# तळोदा तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी चेतन इंगळे; सचिवपदी राजेंद्र मगरे यांची बिनविरोध निवड



दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा तालुका पत्रकार संघाची सन २०२६-२७ या वर्षासाठीची नूतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. अध्यक्षपदी चेतन इंगळे तर सचिवपदी राजेंद्र मगरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असून, नूतन पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

शहरातील शासकीय विश्रामगृह येथे तालुका पत्रकार संघाची वार्षिक सर्वसाधारण बैठक मावळते अध्यक्ष वसंत मराठे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी गेल्या कार्यकाळातील कामांचा आढावा घेण्यात आला. संघटनेच्या बळकटीकरणासाठी आणि कामाला गती देण्यासाठी नवीन चेहऱ्यांना संधी देण्याचा निर्णय या बैठकीत खेळीमेळीच्या वातावरणात घेण्यात आला.

नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे:

अध्यक्ष: चेतन इंगळे
उपाध्यक्ष: गुलाबसिंग गिरासे
सचिव: राजेंद्र मगरे
कोषाध्यक्ष: राजेश माळी

अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर बोलताना चेतन इंगळे यांनी सर्वांचे आभार मानले. तालुक्यातील सर्व पत्रकारांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आणि जनतेच्या समस्यांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी पत्रकार संघ कटिबद्ध राहील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. या बैठकीला तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार वसंत मराठे, मंगेश पाटील, रमेशकुमार भाट, अविनाश माळी, फुंदीलाल माळी, दिपक गोसावी, सुनील मगरे, नितीन गरुड यांच्यासह पत्रकार संघाचे सदस्य उपस्थित होते. या निवडीबद्दल तालुक्यातील राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# नंदुरबार हादरले! वाघेश्वरी टेकडीवरील मंदिरात चोरट्यांचा भरदिवसा डल्ला; देवीचे चांदीचे दागिने लंपास

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार शहराचे श्रद्धास्थान असलेल्या वाघेश्वरी टेकडी येथील वाघेश्वरी मंदिरात अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांनी मंदिराचा कडी-कोंडा तोडून देवीच्या मूर्तीवरील मौल्यवान चांदीचे दागिने आणि दानपेटीतील रोख रक्कम असा हजारो रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, ही चोरी २० मार्च २०२६ रोजी रात्री ८ वाजेपासून ते २१ मार्च २०२६ च्या पहाटे ५:३० वाजेच्या दरम्यान घडली. मयूर राजेंद्र मराठे (वय ३२, रा. जुनी भोईगल्ली) यांनी या प्रकरणी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दोन अज्ञात चोरट्यांनी मंदिराच्या दरवाजाचा कडी-कोंडा तोडून मंदिरात अनाधिकृत




प्रवेश केला.

त्यात चांदीचा मुख्य मुकुट: ४० भार वजनाचा (किंमत ३०,०००/- रुपये)
चांदीचा उजवा कान: ६ भार वजनाचा (किंमत ४,५००/- रुपये)
लहान मूर्तीचा मुकुट: ५.५ भार वजनाचा (किंमत ४,१२५/- रुपये)
दानपेटीतील रोकड: अंदाजे १,२००/- रुपये

अशा प्रकारे एकूण ३९,८२५ रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे.

घटनेची माहिती मिळताच नंदुरबार शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (अ ), ३३१ (४) व ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक निलेश देसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक छगन चव्हाण पुढील तपास करत आहेत.

शहरातील एका मुख्य धार्मिक स्थळावर अशा प्रकारे चोरी झाल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे आणि चिंतेचे वातावरण पसरले असून, चोरट्यांना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी केली जात आहे.

# माऊली जिनिंग समोर मोटार सायकल कारचा अपघात अपघातात मोटारसायकल वरील दोघे गंभीर जखमी

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

केज अंबाजोगाई रोडवर असलेल्या माऊली जिनिंग समोर एका मोटार सायकलीला भरधाव वेगातील कारने राँग साईडने धडक दिल्याने दोघे गंभीर जखमी झाले आहेत.

दि. १९ मार्च रोजी दुपारी ४:३० वाजण्याच्या सुमारास केज येथे सेंट्रिगचे काम करुन परळीकडे मोटार सायकल क्र. (एम एच-२३/ बी एल-५०५३) वरून परळी कडे जात होते. त्यावेळी त्यांना

केज-अंबाजोगाई रोडवर केज येथील उपजिल्हा रुग्णालय जवळ असलेल्या माऊली जिनिंग जवळ समोरून येणाऱ्या भरधाव वेगातील बलेनो कंपनीच्या पांढऱ्या रंगाच्या कारने तिच्या समोरील एका वाहनाला ओहरटेक करीत असताना भरधाव वेगातील



कार निष्काळजीपणे व हयगईने चालवून मोटार सायकलीला राँग साईडने जोराची धडक दिली. यात मोटार सायकल वरील रवि गोदाम आणि सतीश कसबे (दोघे रा. परळी जि. बीड) हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. तर मोटार सायकलीचे नुकसान झाले आहे. मोटार सायकलीला धडक दिल्या नंतर कारचालक पळून गेला.

दोघा जखमीवर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय येथे उपचार करून रवी गोदाम याच्या पायाला गंभीर दुखापत असल्याने त्याच्यावर संभाजीनगर येथे उपचार सुरू आहेत.

# निलंगा पंचायत समितीत आवास योजनेवर कार्यशाळा गटविकास अधिकारी सतीश पाटील यांचे मार्गदर्शन

दैनिक वादळ वार्ता
**लातूर । प्रतिनिधी**

निलंगा : ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला सुरक्षित व पक्के घर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनाच्या विविध आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी निलंगा येथील पंचायत समिती सभागृहात दि. १७ मार्च २०२६ रोजी तालुकास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सतीश पाटील उपस्थित होते. यावेळी त्यांनी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) तसेच राज्य पुरस्कृत आवास योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करत संबंधित अधिकारी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले.

कार्यशाळेत संबंधित अधिकारी, कर्मचारी, विस्तार अधिकारी (सांख्यिकी), घरकुल शाखा सहाय्यक, संगणक ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, तसेच तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर आवास अभियान (ग्रामीण) अंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात दि. १७ मार्च २०२६ ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या अभियानाद्वारे प्रलंबित घरकुलांची कामे जलद गतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

अभियानांतर्गत झच-धक्रटप्पा-१ मधील '-' प्रवर्गातील अपूर्ण घरकुले पूर्ण करणे, झच-धक्र टप्पा-२ मधील घरकुले कालबद्धरीत्या पूर्ण करणे, तसेच राज्य पुरस्कृत आवास योजनांतील अपूर्ण घरकुलांची पूर्तता करणे ही प्रमुख उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. याशिवाय सन २०२४-२५ व २०२५-२६ मधील मंजूर घरकुले पूर्ण करून लाभार्थ्यांना 'पीएम सूर्यधर' योजनेचा लाभ देण्यावरही विशेष भर दिला जाणार आहे.

या अभियानाची १०० टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य करण्यासाठी तालुका व ग्रामपंचायत स्तरावर काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार असून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पंचायत समिती व ग्रामपंचायतींचा जिल्हास्तरावर स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077